# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ- संध्याकाळी 06.00 वा.

## दिनांक-01.09.2026 वार- मंगळवार

---

**कुकडी प्रकल्प**

पुणे जिल्ह्यातील कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या कामासाठी, ५ हजार ७०४ कोटी ५० लाख रुपयांच्या तरतुदीला, आज मुंबईत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागातील सिंचन सुविधांना बळकटी मिळणार आहे.

**पिं-चिं-भटकेविमुक्त दिवस**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं आज ७५ वा भटके-विमुक्त दिन आज साजरा करण्यात आला. या निमित्ताने रक्तदान, आरोग्य तपासणी शिबिर, तसंच प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. 'भटक्या-विमुक्त समाजाची सामाजिक, शैक्षणिक तसंच आर्थिक परिस्थिती - समाजाची दशा आणि विकासाची दिशा' या विषयावरील एका परिसंवादाचंही आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाला महापौर रवि लांडगे, पालिका आयुक्त डॉक्टर विजय सूर्यवंशी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**लष्करप्रमुख भेट**

लष्करप्रमुख जनरल धीरज सेठ यांनी पुण्यातील 'सदर्न कमांड'च्या मुख्यालयाला काल भेट दिली. यावेळी त्यांनी कमांडच्या युद्धसज्जतेचा तसेच क्षमता वाढविण्यासाठी सुरू असलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. 'सदर्न कमांड'चे 'जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ' लेफ्टनंट जनरल राजेश पुष्कर यावेळी उपस्थित होते. या भेटीदरम्यान, जनरल धीरज सेठ यांनी, सैनिक कल्याण, युवा सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन आणि समाजसेवा या क्षेत्रांत माजी सैनिकांनी दिलेल्या योगदानाबद्दल 'योद्धा सेवा सन्मान' देऊन त्यांना सन्मानित केले.

**AFMC-संचालक**

डॉक्टर व्हाईस ॲडमिरल मनीष होनवाड यांनी आज पुण्यातील 'आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेज' अर्थात AFMC च्या संचालक आणि कमांडंट पदाचा कार्यभार स्वीकारला. हा पदभार स्वीकारण्यापूर्वी, त्यांनी नौदल मुख्यालयात तसेच 'आयएनएचएस संजीवनी' आणि 'आयएनएचएस अश्विनी' या युद्धनौकांचे कमांडिंग ऑफिसर म्हणून काम पाहिले आहे.

**Internship-देवळे**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत, पदवीच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना आंतरवासिता अर्थात इंटर्नशिपची संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील अध्यापकांना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे उच्च शिक्षण संचालक आणि राज्य अध्यापक विकास संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. शैलेन्द्र देवळेकर यांनी आज पुण्यात दिली. राज्यातील सुमारे नऊ लाख विद्यार्थ्यांना इंटर्नशिपची संधी देण्याचे उद्दिष्ट असल्याचं त्यांनी पुढे सांगितलं.

**सीएनजी दरवाढ**

महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड अर्थात एमएनजीएलने, पुणे शहरासह पिंपरी-चिंचवड, चाकण, तळेगाव आणि हिंजवडी परिसरातील वाहनांसाठी वापरल्या जाणाऱ्या सीएनजीच्या दरात प्रतिकिलो २ रुपयांची वाढ केली आहे.

त्यामुळे सीएनजीचा किरकोळ विक्री दर आता ९७ रुपये ७५ पैसे  रुपये प्रतिकिलो झाला आहे. हा नवा दर काल मध्यरात्रीपासून लागू करण्यात आला आहे.

**लेझर लाइटबंदी**

पुणे जिल्ह्यात सार्वजनिक गणेशोत्सवादरम्यान अर्थात 14 ते 25 सप्टेंबर या कालावधीत लेझर लाईटच्या वापराला मनाईचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जारी केले आहेत.  या आदेशाचा भंग केलेला आढळून आल्यास, संबंधित व्यक्ती, संस्था तसंच मंडळांवर न्यायालयीन तरतुदींनुसार कारवाई करण्यात येईल असं आदेशात नमूद करण्यात आलं आहे.

**ध्वनीप्रदूषण-अमितेशकुमार**

यंदाच्या गणेशोत्सवात पुण्यात ध्वनीप्रदूषणाला आळा घालण्यासाठी 'पुणे पॅटर्न' तयार करण्याचा निर्धार पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी व्यक्त केला आहे. पुणे पोलिसांच्या विघ्नहर्ता ट्रस्टतर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. गणेशोत्सव आणि दहीहंडी उत्सवात डीजे, प्रेशर मिड आणि प्लाझ्माचा वापर टाळण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**गणेशोत्सव-विशेषरेल्वे**

गणेशोत्सवात प्रवाशांची होणारी वाढती गर्दी लक्षात घेऊन, मध्य रेल्वेनं कोकणातील विविध स्थानकांसाठी मुंबई, पुणे आणि नागपूर इथून एकंदर २६२ विशेष गाड्यांच्या फेऱ्या जाहीर केल्या आहेत. यामध्ये २०० आरक्षित आणि ६२ अनारक्षित विशेष गाड्यांचा समावेश आहे.

**दागिनेचोर-अटक**

पुण्यात गर्दीच्या ठिकाणी महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरणाऱ्या मध्य प्रदेशातील सहा महिलांना लक्ष्मीनगर पोलिसांनी अटक केली आहे. सुमारे सात लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**निधन-शशिकांत भंडारे**

जुन्या पिढीतील ज्येष्ठ संगीत शिक्षक, साहित्यिक आणि कीर्तनकार शशिकांत भंडारे यांचे रविवार ३० ऑगस्टला वृद्धापकाळानं निधन झाले.  ते ८६ वर्षांचे होते.  "नादब्रह्म संगीत विद्यालयाच्या" माध्यमातून त्यांनी गेली सुमारे 60 वर्षं संगीताचं अध्यापन केलं.  ते उत्तम व्हायोलिनवादक आणि हार्मोनियमवादक तसंच लेखक होते.

**अन्वीहिंगे-सत्कार**

पिंपरी चिंचवड शहरातील  युवा बुद्धिबळपटू, ९ वर्षीय अन्वी हिंगे हिने Woman Candidate Master हा प्रतिष्ठेचा किताब प्राप्त केला असून नऊ वर्षांखालील मुलींच्या फिडे मानांकनात, जागतिक क्रमवारीत प्रथम स्थान मिळवण्याचाही बहुमान मिळवला आहे. अन्वीच्या या कामगिरीबद्दल महापौर रवी लांडगे यांच्या हस्ते तिचा आज  सत्कार करण्यात आला.

**हवामान**

पुणे शहर आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ होतं. आज कमाल 30 अंश तर किमान 21 पूर्णांक 8 अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**